# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६२१२२८
२५६२१२२९
ई–मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे–४११००७.

संदर्भ : साफुपुवि/निवि/३८८ दिनांक : १२ सप्टेंबर, २०२५

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
संलग्नित महिला महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'फक्त महिला महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना उपयोगी साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य योजना' (योजना क्र. ०३२५२६)या उपक्रमाअतंर्गत अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करणेबाबत.**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत फक्त महिला महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थासाठी **'फक्त महिला महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना उपयोगी साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य योजना'** या उपक्रमाअंतर्गत अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी **शुक्रवार, दिनांक १२/०९/२०२५ ते सोमवार दिनांक २९/०९/२०२५** असा राहणार आहे.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे –

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—College Login & Password—Planning and Development**

आपणास विनंती की, सदर उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची छापील प्रत व त्यासोबत नियमावलीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून **सोमवार दिनांक ०६/१०/२०२५** पर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी. तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही. नियमावलीध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना बंधनकारक राहतील. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपली विश्वासू,

१२/९/२५

डॉ. वैशाली साकोरे
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)

सोबत : योजना व नियमावली

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रम

## योजना क्र. ०३२५२६

## योजनेचे नाव : फक्त महिला महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना उपयोगी साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य योजना

**प्रस्तावना :**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित फक्त महिला महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यामध्ये प्रयोगशाळा उपकरणे/महिलांसाठी क्रिडा साहित्य/लेडिज कॉमन रूममधील आवश्यक साहित्य (उदा. प्रथमोपचार पेटी)/सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशिन व इनसिनेटर किंवा इतर महिलांना उपयोगी (कार्यालयीन साधने (Office Equipment) वगळून) साहित्य खरेदीसाठी विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य देण्याचे प्रस्तावित आहे.

**योजनेचे स्वरूप :**

१) या योजनेसाठी फक्त महिला महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत.

२) ज्या महाविद्यालये/परिसंस्था यांनी नॅक/एनबीए मुल्यांकनासाठी अर्ज करण्यास पात्र असुनही त्यांनी एकदाही नॅक/एनबीए केले नाही अशा महाविद्यालये/परिसंस्था यांचा सदर योजनेच्या अर्थसहाय्यासाठी विचार करता येणार नाही.

३) ज्या महाविद्यालये/परिसंस्थांकडे विद्यापीठ मान्यताप्राप्त पुर्णवेळ/प्रभारी प्राचार्य/संचालक आहेत अशीच महाविद्यालये/परिसंस्था या योजनेसाठी पात्र राहतील.

४) सदर योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या साहित्यावर 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत' अर्थसहाय्य असा उल्लेख असणे आवश्यक आहे.

५) विद्यापीठाकडून देण्यात येणारे अर्थसहाय्याचे प्रमाण : ८०:२०

६) विद्यापीठाकडून देण्यात येणारे कमाल अर्थसहाय्य

| अ. क्र. | महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था | विद्यापीठाकडून देण्यात येणारे कमाल अर्थसहाय्य |
|---|---|---|
| १ | व्यावसायिक महिला महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था | रू. २,००,०००/— |
| २ | अव्यावसायिक महिला महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था | रू. १,५०,०००/— |

७) **मुदत** : मंजुरी दिल्यानंतर **पुढील १२० दिवसांच्या आत** खरेदी करून खरेदीची देयके सनदी लेखापालाकडून तपासणी करून सर्व मुळ कागदपत्रांसहित वित्त व लेखा विभागाची तपासणी सुची नुसार नियोजन व विकास विभागास सादर करावी.

८) सदर योजनेअंतर्गत विद्यापीठाने निश्चित केलेल्या साहित्याची उपकरणांची यादी

अ) प्रयोगशाळा उपकरणे
ब) महिलांसाठी क्रिडा साहित्य
क) लेडिज कॉमन रूममधील आवश्यक साहित्य (उदा.प्रथमोपचार पेटी)
ड) (कार्यालयीन साधने वगळून) महिलांशी संबंधित इतर उपयोगी साहित्य

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रम

## योजना क्र. ०३२५२६

## योजनेचे नाव : फक्त महिला महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना उपयोगी साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य योजना

### नियमावली

१) ज्या महाविद्यालये/परिसंस्था यांनी नॅक/एनबीए मुल्यांकनासाठी अर्ज करण्यास पात्र असुनही त्यांनी एकदाही नॅक/एनबीए केले नाही अशा महाविद्यालये/परिसंस्था यांचा सदर योजनेच्या अर्थसहाय्यासाठी विचार करता येणार नाही.

२) ज्या महाविद्यालये/परिसंस्थांकडे विद्यापीठ मान्यताप्राप्त पुर्णवेळ/प्रभारी प्राचार्य/संचालक आहेत अशीच महाविद्यालये/परिसंस्था या योजनेसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यास पात्र राहतील.

३) ज्या महाविद्यालये/परिसंस्था यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चालू वर्षाचे संलग्नीकरणाचे शुल्क अदा केले आहे अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

४) ज्या महाविद्यालये/परिसंस्थेवर विद्यापीठ पातळीवर कोणतीही गंभीर स्वरुपाची कारवाई झालेली नाही किंवा सुरू नाही. अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल. त्यासंबंधीचे हमीपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

५) ज्या महाविद्यालये/परिसंस्थेने विद्यापीठाकडून उचल रकमेअंतर्गत घेतलेल्या रकमेचे सर्व खर्चाचे हिशोब विद्यापीठास वेळेत सादर केलेले आहे. अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

६) विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था जर संबंधित महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या स्वतंत्र अभिमत/खाजगी विद्यापीठाशी (महाविद्यालय/परिसंस्था विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या नावाने अथवा बदलेल्या नावाने) संलग्नित झाले असेल तर अशा अभिमत/खाजगी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय/परिसंस्थेला गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत प्रस्ताव दाखल करता येणार नाही.

७) ज्या महाविद्यालये/परिसंस्थेने विद्यापीठाकडे महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी अर्ज सादर केला असेल अशा महाविद्यालय/परिसंस्थेचा गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यात येणार नाही. जर अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशोब स्विकारण्यात येणार नाहीत.

८) गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करताना जर एखाद्या महाविद्यालय/परिसंस्थेने प्रस्तावामध्ये चुकीची, दिशाभूल करणारी अथवा खोटी माहिती सादर केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित महाविद्यालये/परिसंस्थेस गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेण्यास पुढील तीन वर्ष अपात्र ठरविण्यात येईल.

९) एकूण खर्चाच्या ८०:२० प्रमाणानुसार (८० टक्के विद्यापीठ हिस्सा, २० टक्के महाविद्यालये/परिसंस्थेचा हिस्सा) अदा करण्यात येईल.

१०) ज्या महाविद्यालयात/परिसंस्थेत प्रथम वर्ष विद्यार्थी संख्या शून्य आहे अशा महाविद्यालय/परिसंस्थाना गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करता येणार नाही. अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थानी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत. प्रथम वर्ष विद्यार्थी संख्या शुन्य नसल्याचे हमीपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

११) नियोजन व विकास विभागाला वार्षिक अहवालाची माहिती जमा केल्याची पोहोच प्रत, त्याचप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षाची AISHE व MIS ची माहिती भरली असल्याचे प्रमाणपत्र अथवा ना–हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठ निधी (प्रोरेटा) क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास मंडळ, शैक्षणिक प्रवेश विभाग,

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

प्रोरेटा तसेच चालू शैक्षणिक वर्षाचे संलग्नीकरणाचे (नूतनीकरण) शुल्क भरलेल्या चलनाची छायांकित प्रत इ. प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१२) महाविद्यालय/परिसंस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चालू वर्षाचे संलग्नीकरणाचे/ संलग्नीत असल्याचे विद्यापीठाचे पत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१३) संबंधित महिला महाविद्यालये/परिसंस्थेतील कायमस्वरुपी मान्यताप्राप्त/प्रभारी प्राचार्य/संचालक यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालय/परिसंस्थेतून दुसऱ्या महाविद्यालय/परिसंस्थेत बदली झाली असेल तर संस्थेच्या बदली आदेशाची प्रत तसेच प्राचार्य/संचालक यांची बदली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरून झाली असल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मान्यता पत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक आहे.

१४) उपकरणे खरेदी करण्यासाठी तीन पुरवठादारांची/कंपन्याची दरपत्रके जर ई—मेल वरून मागविली असतील तर सदर दरपत्रके ज्या ई—मेल वरून आले त्या ई—मेलच्या पहिल्या पानाची प्रत व दरपत्रक प्राचार्य/संचालकाच्या सही शिक्क्यासह प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१५) विद्यापीठाने अर्थसहाय्य मंजूरीची यादी जाहीर केल्यानंतर महाविद्यालये/परिसंस्थेने उपकरणे खरेदीची प्रक्रिया राबवावी.

१६) गुणवत्ता सुधार योजनेसाठीचे अनुदानाबाबतचे निर्णय हे संबधित अर्थशिर्षात शिल्लक असलेल्या रकमेच्या अधिन राहून घेतले जातील.

१७) कोणताही प्रस्ताव मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राखीव असतील.

१८) ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत छापून (Printout) त्यासोबत मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागाकडे विहीत मुदतीत सादर करावी. विहीत मुदतीनंतर, अपूर्ण कागदपत्रे जोडलेले, नियमावलीनुसार नसलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे —

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—College Login & Password—Planning and Development**

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
PLANNING AND DEVELOPMENT
PUNE-7